पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

व

## बहि:शाल शिक्षण मंडळ,

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

# भूजल व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण शिबिर

## शिबिर अहवाल

**शिबिर कालावधी**

**दि. १४ व १५ डिसेंबर २०१९**

**समन्वयक**

डॉ. कल्याणकर पी. एम.

प्रा. पांडे व्ही. आर.

**प्राचार्य**

डॉ. एस. आर. टकले

अनुक्रमनिका

| अ. क्र. | तपशिल |
|---|---|
| १) | शिबिराचा टंकलिखित अहवाल |
| २) | फोटो |
| ३) | कार्यक्रम पत्रिका |
| ४) | वर्तमानपत्रातील बातम्या |

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**

व

**बहि:शाल शिक्षण मंडळ,**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

यांच्या संयुक्त विद्यमाने

# भूजल व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण शिबिर

## दि. १४ व १५ डिसेंबर २०१९

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ व १५ डिसेंबर २०१९ या कालावधीत भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या या शिबिरात राबवण्यात आलेल्या उपक्रमांचा अहवाल पुढीलप्रमाणे:

**शिबिरपूर्व गावभेटी:-**

या शिबिराची माहिती फुलंब्री तालुक्यातील विविध गावातील लोकांनाव्हावी यासाठी या शिबिराचे समन्वयक डॉ. कल्याणकर पी. एम. व प्रा. पांडे व्ही. आर., तसेच महाविद्यालयातील विविध प्राध्यापकांनी विविध गावांना भेटी देऊन, शेतकऱ्यांना या शिबिराच्या पत्रिका देऊन शिबिरासंदर्भात माहिती दिली. यामध्ये दरेगाव (दरी), बिल्डा, लहाण्याची वाडी, पाल, किनगाव, वारेगाव, चिंचोली (बू.), गणोरी, कान्होरी इ. गावांना भेटी देऊन जवळपास २५० शेतकरी व गावकऱ्यांशी प्रत्यक्षभेटीद्वारे संपर्क साधून कार्यक्रमास येण्याचे निमंत्रण देण्यात आले.

**शिबिरातील विविध सत्रः-**

**दि. १४ डिसेंबर २०१९, उद्घाटन सत्रः**

या शिबिराचे उद्घाटन दि. १४ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०.३० वा. डॉ. प्रविण वक्ते (प्र-कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. कैलास पाथ्रीकर, (बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बा.आं.म.वि.औरंगाबाद), श्री. संजय शिंदे (जनसंपर्क अधिकारी, डॉ. बा.आं.म.वि.औरंगाबाद) व डॉ. प्रसन्न पाटील (प्रकल्प संचालक, सावित्रीबाई फुले महिला एकात्म मंडळ, हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद) यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे श्री. देवजीभाई पटेल हे उपस्थित होते.

यात्रसंगी शिबिराचे उद्घाटन डॉ. प्रविण वक्ते यांनी केले. यात्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, भारतीय समाज हा आध्यात्मवादी व पारंपारिक शेती करणारा समाज आहे. आधुनिक शेती करण्याच्या नादात शेतकऱ्यांनी आपला उत्पादन खर्च तर वाढून घेतलाच परंतु त्याचबरोबर किटकनाशके व रासायनिक खतांच्या अति वापरातून जमीन प्रदुषित केली. तेव्हा शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास तर धरावी परंतु पारंपारिक शेती ज्यामध्ये सेंद्रिय खते, गावरान बियाने यांच्या संगतीने शेती केल्यास जीवन विकसित तर होईलच, परंतु त्याचबरोबर सुखही होईल. आध्यात्मिक ज्ञानाचा फायदा शेतकरी समुदायाला शेती करतांना जीवन आनंदी ठेवण्यासाठी होईल. असा सल्ला देऊन शेतकरी मित्रांनी आत्महत्या सारखे विचारही मनात येऊ देऊ नयेत, असेही आग्रहाने सांगितले.

डॉ. कैलास पाथ्रीकर यांनी सद्यकालीन अर्थव्यवस्थेत शेतीचा खर्च अतिशय जास्त प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाला उत्पादनाचा भाव मिळत नाही. कारण सरकारने कांद्या सारख्या अनेक शेती उत्पादनाला हमीभाव दिलेला नाही. सरकारने जर पीकांचा हमीभाव ठरवून दिला तर शेतकरीवर्ग ती पिके घेतील व आनंदाने जीवन जगतील असे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

डॉ. संजय शिंदे यांनी शेतीच्या क्षेत्रात ज्या लोकांना अनुभव आहेत अशी माणसे समाजात पुढे येऊन जर त्यांनी आपल्या अनुभवांची इतर शेतकरी वर्गांबरोबर देवाण-घेवाण

केली तर त्याचा फायदा शेतकरी वर्गाला होईल. आज जो वर्ग शेती करत नाही ते शेती संदर्भात अधिक बोलत असल्याचे चित्र दिसते.

डॉ. प्रसन्न पाटील यांचीही या प्रसंगी उपस्थिती होती. त्यांनी शेतीचक्राचा आढावा घेतांना सांगितले की, शेती ज्या-ज्या घटकांवर अवलंबून आहे, ते-ते घटक आपण टिकवले पाहिजे नव्हे तर त्यांचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. जसे की आपण सेंद्रिय खतांचा वापर केल्यास शेतीमधील घटकतत्त्वे वाढतील, त्याचबरोबर सामुदायिक व सर्वांनी भूसंधारणाची कामे केल्यास मातीचा सुपीक थर वाहून जाणार नाही, पशूपालन केल्यास सेंद्रिय खते मिळतील, दूध मिळेल, त्यातून उत्पन्नही वाढेल.

उद्घाटनाच्या सत्रात बीजभाजक म्हणून डॉ. सर्जेराव ठोंबरे (मानद संचालक, गोपीनाथ मुंढे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था, डॉ. बा.आं.म.वि.औरंगाबाद) यांनी शेतकरी व मराठवाड्यातील जीवन हे झाड, माती आणि पाणी यांच्यावर विसंबून आहे. आपण या तिन्हींचीही नासाडी करत आहोत. त्यामुळे आपण घरापासून सुरुवात करावी. ज्यातून आपल्या सांडपाण्यावर घराभोवती परसबाग विकसित करावी. शेती, पीक पद्धती, पाणी वापर इत्यादी शेतीसंबंधी बाबींचा समावेश हा शालेय स्तरावरील अभ्यासक्रमात जर समाविष्ठ करण्यात आला तर त्याचा भावी पिढ्यांना फायदा होऊन शेती उत्पादनात वाढ होईल. त्याचबरोबर पाणी व्यवस्थापन व्यवस्थित करता येईल.

अध्यक्षीय समारोप करतांना संस्थेचे अध्यक्ष श्री. देवजीभाई पटेल म्हणाले की, भारत हा कृषीप्रधान देश आहे. पूर्वीपासून भारतात, तसेच मराठवाड्यात शेती पारंपारिक पद्धतीने होते. आधुनिक काळात एवढी प्रगती, विकास होऊनही आत्महत्या होतांना दिसतात, परंतु पूर्वी एकही शेतकरी आत्महत्या केल्याचे दिसत नाही. त्यामुळे वर्तमान शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीची कास धरावी, तंत्रज्ञानाचा उपयोग करावा जेणेकरुन आपले उत्पादन वाढेल. परंतु काही कारणास्तव जर शेती उत्पादन हाती लागले नाही तर खचून न जाता धैर्याने त्या संकंटाना सामोरे जावे.

या उद्घाटन सत्रात प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी प्रास्ताविक करुन शिबिर आयोजनाची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले.

**सत्र पहिलेः पाण्याचा ताळेबंद**

यावेळी भूगर्भातील पाणी या विषयावर भूजल सर्वेक्षण विकास संस्थेने एक लघुपट शेतकऱ्यांना दाखविला. यावेळी डॉ. पी. एल. साळवे, (उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा) हे म्हणाले की, या लघुपटातील सांगण्याप्रमाणे गावातील शेतकऱ्यांनी भूगर्भातील पाण्याचा जबाबदारीने वापर करावा व त्याच्या वाढीसाठी सामुहिक प्रयत्न करावेत. यावेळी पाण्याचा ताळेबंद या विषयावर डॉ. शरद गायकवाड (कनिष्ठ वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा) यांनी पीपीटीच्या आधारे आपले विचार उपस्थितांपुढे मांडले. त्यांनी महाराष्ट्रातील पर्जन्यमानाचा आढावा घेऊन आपल्या भागातील पीक पद्धती गावकऱ्यांनी ठरविली पाहिजे. एखाद्या भागातील भूजल पातळी ही त्या भागात पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणाबरोबरच त्या भागातील खडकाची रचना व खडकाचा प्रकार यावर अवलंबून असते, असे मत त्यांनी मांडले. यावेळी डॉ. इरफान शहा, सेवानिवृत्त, संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे, श्री. जी. डी. महाजन, (सहाय्यक भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण यंत्रणा) यांची प्रमुख उपस्थित होती.

**सत्र दुसरेः फुलंब्रीतील पाझर तलाव सद्यस्थिती व उपाय योजना**

शिबिरातील दुसरे सत्र फुलंब्रीतील पाझर तलाव सद्यस्थिती व उपाय योजना या विषयावर संपन्न झाले. यावेळी डॉ. पी. एस. कुलकर्णी, (स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद) यांनी पीपीटीच्या आधारे तालुक्यातील विविधि ठिकाणाच्या पाझर तलावांच्या संदर्भात माहिती दिली. त्यात अनेक पाझर तलाव हे चांगल्या स्थितीत आहेत तर काहींच्या भिंतीला तडे गेलेले आहेत. काहीमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे तलावाची साठवण क्षमता कमी झालेली आहे. काही पाझर तलावाच्या ठिकाणाचा खडक कमी कडक असल्याने पाणी जमीनीत मुरत नाही, त्यामुळे आजुबाजूच्या विहिरींची पाणी पातळी वाढत नाही, असे मत मांडले. या तलावांच्या संदर्भात योग्य नियोजन व कार्यवाही केल्यास त्यांचे पुनर्जीवन करुन पाणी साठवण क्षमता व लाभार्थी क्षेत्र विस्तारले जाऊ शकते.

**सत्र तिसरे: दु. ३:०० ते ४:३०: पाणी फाऊंडेशनचे कार्य: यशस्वी गाथा**

पाणी फाऊंडेशनचे कार्य: यशस्वी गाथा या विषयावर बोलतांना श्री. प्रल्हाद आरसूळ यांनी पाण्याचा प्रश्न हा अतिशय गांभीर्याने घेण्याची गरज असून त्यासाठी गावाने एकत्रित येऊन कार्य करणे, उपक्रम राबविणे अपेक्षित आहे. पाणी फाऊंडेशने चिंचोली व इतर गावांमध्ये गावकऱ्यांनी एकत्रित येऊन कार्य केल्याने त्या गावच्या पाणी पातळीत अतिशय फरक पडला आहे. तसेच प्रत्येक गावात शेतकऱ्यांचा मिळणारा प्रतिसाद हा त्या गावाला पुढे नेणारा असतो हे आम्ही व गावकरी करत असलेल्या कार्यामुळे दिसून आले. या सत्रांचे सूत्रसंचलन प्रा. बाबासाहेब लहाने यांनी केले.

**सत्र चौथे: जलसिंचनाच्या शासकीय योजना, रविवार, दि. १५ डिसेंबर २०१९:**

दि. १५ डिसेंबर २०१९, रविवार रोजी तिसऱ्या सत्रात श्री. व्ही. आर. गोराडे, (कृषी कार्यालय, सिल्लोड) यांनी जलसिंचनाच्या शासकीय योजना या विषयावर अतिशय सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना आपले ज्ञान वाढवण्यासाठी सकाळचा ॲग्रोवन अंक वाचावा, तसेच ग्रामपंचायतीच्या बाहेर पोस्टर रुपाने शासनाच्या विविध योजनांची माहिती अधिकारी देत असतात, त्या पहाव्यात किंवा त्या-त्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात रहावे असा सल्ला दिला. त्याचबरोबर नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पोखरा योजना, ठिबक सिंचन योजना, सौरपंप योजना अशासंदर्भाने शासकीय योजना, अर्ज करण्याची प्रक्रिया, कालावधी, प्राप्त होणारी रक्कम, त्यासाठी असणारी पात्रता यांचा आढावा घेतला.

**सत्र पाचवे : लोकसहभागातून जलव्यवस्थापन**

श्री. नरहरी शिवपूरे यांनी या सत्रात लोकसहभागातून जलव्यवस्थापन या विषयावर विचार व्यक्त केले. मानव कितीही विकसित झाला तरीही तो पाणी निर्माण करु शकत नाही, त्याला पर्याय उपलब्ध करु शकत नाही, पाणी मोठ्या प्रमाणात आयात करु शकत नाही. त्यामुळे पाण्याचे जतन व संवर्धन करणे, ह्यातच मानवाचे हित आहे. यावेळी त्यांनी त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून चित्ते नदी पूनर्जीवन या विषयावरील चित्रफित व पीपीटीच्या आधारे झालेले बदल दाखवून दिली. या सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते.

**समारोप सत्र: पाणी उपलब्धतेनुसार पीक नियोजन**

पाणी उपलब्धतेनुसार पीक नियोजन या विषयावर डॉ. सुहास आजगावकर, (सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, औरंगाबाद) यांनी विचार मांडले. ते म्हणाले की, मराठवाड्यात आगोदरच पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यात भूगर्भातील खडकही काळापाषान आहे. त्यामुळे भूगर्भातील जलसाठे कमी आहेत. या अनुषंगाने कमी पाण्यावर येणारी व मानसाबरोबर जनावरांच्या खाद्यांची व्यवस्था होईल अशी ज्वारी, बाजरी, तूर इत्यादी पीके घ्यावीत. या समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी श्री. शामसुंदर नाईक, (सचिव, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद) हे होते.

फुलंब्री बद्दल माहिती देतांना श्री नाईक म्हणाले की, पूर्वी फुलंब्रीस आंब्यांची भरपूर झाडे होती. त्यांची मोठ्या प्रमाणात तोड झाली. त्यांच्या स्वत:च्या शेतात आंब्यांची १०० झाडे होती हेही त्यांनी सांगितले. अगोदर भाड्याने जमीन दिली जात होत्या. परंतु शासनाने कायदा करुन त्या मोकळ्या करण्याचे आदेश दिले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांची तोड झाली.

आजही शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीचा विचार करावा असा सल्ला त्यांनी दिली. पीक पद्धत निवडतांना पट्टा पद्धत निवडून विविध पिकांची लागवड करावी. या पद्धतीने शेतकऱ्यांनी एकरी एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न काढले आहे. शेतकऱ्यांनी सामुहिक शेतीचा अवलंब करावा असे मत त्यांनी मांडले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. बाबासाहेब लहाने व डॉ. महेश थोरात यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. कल्याणकर पांडुरंग, प्रा. विजय पांडे, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. महेश थोरात, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. संदीप जगताप, डॉ. सुरेश मुंढे यांनी प्रयत्न केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कामाचे वाटप करण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे, पत्रिका वाटप – डॉ. कल्याणकर पी. एम. व प्रा. पांडे व्ही. आर., पाहुण्यांचे निमंत्रण पत्र वाटप – डॉ. कल्याणकर पी. एम., बॅनर तयार करणे – प्रा. पांडे व्ही. आर., सुत्रसंचलन – १४ डिसेंबर, डॉ. नळगीरकर एम. एम., हार व

पुष्पगुच्छ – डॉ. जगताप एस. जे., प्रसिद्धी व फोटो – डॉ. पांचाळ एस. एस., व्यासपीठ बैठक व माईक व्यवस्था – डॉ. मुंढे एस. एम., श्री. जाधव आर. टी., श्री. तुपे व्ही. बी., सर्वांनी आपआपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली. शिबिराच्या आयोजनासाठी बहि:शाल विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी आर्थिक सहाय्य केले.

समन्वयक
डॉ. कल्याणकर पी. एम.
प्रा. पांडे व्ही. आर.

प्राचार्य
डॉ. एस. आर. टकले



दि. १४ डिसेंबर २०१९ रोजी भूजल व्यवस्थापन विषयक शिबिराचे दीपप्रज्वलन करुन उद्‌घाटन करण्यात आले. उद्‌घाटन प्रसंगी डॉ. कैलास पाथ्रीकर, श्री. संजय शिंदे, श्री. देवजीभाई पटेल, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले, डॉ. प्रसन्न पाटील, डॉ. पी. एम. कल्याणकर, प्रा. व्ही, आर. पांडे



प्र-कुलगुरु मा. डॉ. प्रविण वक्ते यांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले




शिबिराचे प्रास्ताविक करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, व्यासपिठावर श्री. देवजीभाई पटेल, डॉ. कैलास पाथ्रीकर, श्री. संजय शिंदे, डॉ. प्रसन्न पाटील, डॉ. सर्जेराव ठोंबरे




शिबिराचे उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरु डॉ. प्रविण वक्ते



शिबिरास उपस्थित शेतकरी




शिबिरास मार्गदर्शन करतांना डॉ. कैलास पाथ्रीकर

(संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद)



शिबिरास मार्गदर्शन करतांना श्री. संजय शिंदे

(जनसंपर्क अधिकारी, डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद)




शिबिरास मार्गदर्शन करतांना डॉ. प्रसन्न पाटील

(प्रकल्प संचालक, सावित्रीबाई फुले महिला एकात्म मंडळ)



उद्घाटन सत्रास बीजभाषक म्हणून मार्गदर्शन करतांना डॉ. सर्जेराव ठोंबरे, व्यासपिठावर श्री. देवजीभाई पटेल, प्र-कुलगुरु डॉ. प्रविण वक्ते, डॉ. प्रसन्न पाटील




शिबिराच्या उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप करतांना श्री. देवजीभाई पटेल (उपाध्यक्ष, पं.दी.उ.शि.सं. औरंगाबाद) व्यासपिठावर प्र-कुलगुरु डॉ. प्रविण वक्ते, डॉ. सर्जेराव ठोंबरे




महाविद्यालयाने फुलंब्री परिसरातील फुलंब्री तालुक्यातील शासकीय विहिर अनुदान योजना लाभार्थी सर्वेक्षणाच्या अहवालाचे विमोचन करतांना प्र-कुलगुरु डॉ. प्रणि वक्ते, डॉ. प्रसन्न पाटील, डॉ. सर्जेराव ठोंबरे, श्री. देवजीभाई पटेल, डॉ. कैलास पाथ्रीकर, श्री. संजय शिंदे, प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले,




शिबिरात पाण्याचा ताळेबंद याविषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. पी. एल. साळवे

(उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा)



शिबिरात भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेद्वारे लघूचित्रपट दाखवण्यात आला




शिबिरात ''पाण्याचा ताळेबंद'' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. शरद गायकवाड

(कनिष्ट वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा)




शिबिरात ''पाण्याचा ताळेबंद'' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. शरद गायकवाड

(कनिष्ट वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा)



प्रशिक्षण शिबिरास ''फुलंब्रीतील पाझर तलाव सद्यस्थिती व उपाय योजना'' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. पी. एस. कुलकर्णी




प्रशिक्षण शिबिरात ''पाणी फाऊंडेशनचे कार्यः यशस्वी गाथा'' या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. प्रल्हाद आरसूळ




दि. १५ डिसेंबर २०१९ रोजी ''जलसिंचनाच्या शासकीय योजना'' या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. व्ही. आर. गोराडे, व्यासपिठावर डॉ. सुहास आजगावकर, श्री. नरहरी शिवपूरे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले




''लोकसहभागातून जलव्यवस्थापन'' या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. नरहरी शिवपूरे




''लोकसहभागातून जलव्यवस्थापन'' या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. नरहरी शिवपूरे




''पाणी उपलब्धतेनुसार पीक नियोजन'' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. सुहास आंजगावकर, व्यासपिठावर श्री. शामसुंदर नाईक (सचिव, पं.दी.उ.शि.संस्था) प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



**समारोप सत्रात अध्यक्षीय समारोप करतांना श्री. शामसुंदर नाईक**
**(सचिव, पं.दी.उ.शि.संस्था), व्यासपिठावर डॉ. सुहास आजगावकर, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले**

## समारोप सत्र

**वेळ :** 3.30 ते 5.00

**विषय**

पाणी उपलब्धतेनुसार पीक योजना

**वक्ते**

डॉ. सुहास आजगावकर,
सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, औरंगाबाद.

**अध्यक्ष**

श्री. शामसुंदर नाईक,
सचिव,
पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद.

**प्रमुख उपस्थिती**

श्री. रतन अंभोरे,
सामाजिक कार्यकर्ते,
सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, औ.बाद.

जमिनीतले पाणी मिळते, मुळ तेव्हा रुजते ।
निष्पर्ण झाडावर प्रेम बसरते, तेव्हा त्यालाही पालवी फुटते ।।

---

**प्रति,**

**मा. श्री./श्रीमती** ______________________

______________________

______________________

**प्रेषक :**
प्राचार्य,
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,
फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद. फोन नं. : (0240) 2633988
संपर्क:-
डॉ. पी.एम.कल्याणकर, 9545899484
प्रा. व्ही.आर.पांडे, 9422723277

---

# ।। निमंत्रण पत्रिका ।।

उद्यमे गिंवसती अर्थ । ज्ञानात उद्यमता ।।

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**
**व**
**बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

# भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

**⊙ शिबिर कालावधी ⊙**
दि. 14 व 15 डिसेंबर 2019

**⊙ शिबिर स्थळ ⊙**
**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,**
फुलंब्री जि. औरंगाबाद.

**⊙ शिबिरातील विविध उपक्रम ⊙**
शासकीय योजना — जलव्यवस्थापन
जलकार्याच्या यशस्वीगाथा — पीक योजना

**विनित**

डॉ. पी. एम. कल्याणकर — डॉ. एस. आर. टकले
प्रा. व्ही. आर. पांडे — प्राचार्य

पाणी, वाणी आणि नाणी नासू नये
- संत तुकाराम

*थेंब थेंब वाचवा पाणी, जगण्याची लिहा कहाणी ।*
*पशू-पक्षी मूक वनचरे, शोधतात जल रानोवनी ।।*

**महोदय/महोदया,**

**स.न.वि.वि.**

बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने **''भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर''** दि. 14 व 15 डिसेंबर 2019 या कालावधीत आयोजित केले आहे. शिबिरामध्ये पाण्यासंबंधीचे उद्बोधन मार्गदर्शन व चर्चा होणार असून या शिबिरात फुलंब्री तालुक्यातील शेतकरी, ग्रामस्थ सहभागी होणार आहेत. ज्यामुळे आपल्या परिसरातील पावसाच्या पाण्याचे नियोजन, पाणी बचत, कमी पाण्यात कृषी उत्पादनात वाढ इत्यादी संदर्भाने लोकांमध्ये जागृती होणे व त्यासंबंधाने प्रत्यक्ष कृती होणे अपेक्षित आहे.

तरी आपण या शिबिरात सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.

मी थेंब एक पाण्याचा, मी स्वर जीवनगाण्याचा ।
वाचवा, मला वाचवा, हाच माझ्या ओठी जोगवा ।।

## ✱ उद्घाटन समारंभ ✱

**शनिवार, 14 डिसेंबर 2019,**

### स. 10.30 ते 12.30

**उद्घाटक**
**डॉ. प्रविण वक्ते,**
प्र-कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

**बीजभाषक**
**डॉ. सर्जेराव ठोंबरे,**
मानद संचालक, गोपीनाथ मुंढे रा. ग्रा.वि. सं. संस्था

**प्रमुख उपस्थिती**
**डॉ.कैलास पाथ्रीकर,**
संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ
**डॉ. प्रसन्न पाटील,**
हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद.
**श्री. संजय शिंदे,**
जनसंपर्क अधिकारी, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ

**अध्यक्ष :**
**मा. श्री. देवजीभाई पटेल,**
उपाध्यक्ष, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद.

### पहिले सत्र

**वेळ** : 12.30 ते 1.30

**विषय:**- पाण्याचा ताळेबंद
**वक्ते:** डॉ. पी. एल. साळवे,
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, औ.बाद.

**भोजन**
1.30 ते 2.30

सहवेल तृष्णा तुम्हा आम्हा, काही काळ नसता पाणी ।
जीवन नाम दुसरे आप, म्हणूनी सर्वांना जगवी पाणी ।।

### दुसरे सत्र

**वेळ** : 2.30 ते 3.30

**विषय:** फुलंब्रीतील पाझर तलाव : सद्यस्थिती व उपाय योजना
**वक्ते:** डॉ. पी. एस. कुलकर्णी, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औ.बाद

**वेळ** : 3.30 ते 4.30

**विषय-** पाणी फाऊंडेशनचे कार्य व यशस्वी गाथा
**वक्ते-** श्री. प्रल्हाद आरसूळ, जिल्हा समन्वयक, पाणी फाऊंडेशन
श्री. सखाहरी बिनोरकर, ग्रामस्थ, चिंचोली बु.

## रविवार, दि. 15 डिसेंबर 2019

### तिसरे सत्र

**वेळ** : 10.30 ते 12.00

**विषय-** जलसिंचनाच्या शासकीय योजना (ठिंबक, तुषार, शेततळे, सौरपंप)
**वक्ते**-श्री. व्ही. आर. गोराडे, कृषी साहाय्यक, कृषी कार्यालय, सिल्लोड.

### चौथे सत्र

**वेळ** : 12.00 ते 1.30

**विषय-** लोकसहभागातून जलव्यवस्थापन
**वक्ते-** श्री. नरहरी शिवपुरे, सचिव, ग्रामविकास संस्था, औ.बाद.

**भोजन**, 1.30 ते 2.30

### पाचवे सत्र

**वेळ** : 2.30 ते 3.30

**विषय:**- कृषीकन्या व जलमित्र यांचे अनुभव कथन

थांबवुनी अपव्यय वाचवू शक्यतो हातून जेवढे पाणी,
करुन स्वत: सार्थ योजना समजू जलबचत आणिबाणी ।

# Publicity of Workshop

# 2019-20

दै. सकाळ - २४ डिसें. २०१९ (16)



औरंगाबाद : भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ. प्रवीण वक्ते

## पारंपरिक शेतीला हवी जलव्यवस्थापनाची जोड

### प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांचे मत

**औरंगाबाद, ता. २३ : आधुनिक शेती शेतकऱ्यांनी गांभीर्याने घ्यावी. त्यासोबतच जलव्यवस्थापनावर भर दिला पाहिजे. आध्यात्मिक ज्ञानाकडेही डोळसपणे पाहण्याची गरज आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना विचारशांती मिळण्यास मदत होईल, असे मत प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांनी व्यक्त केले.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळ आणि श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातर्फे दोनदिवसीय भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर नुकतेच पार पडले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. वक्ते बोलत होते. ते म्हणाले, की भूजल व्यवस्थापन कसे करावे, हे सांगण्याची वेळ आज आली आहे. याचे कारण म्हणजे औद्योगिक प्रदूषणामुळे वातावरणात बदल झाला आहे. शेतीतील ज्ञान आणि आध्यात्मिक ज्ञान या दोन्ही बाबींना जोडीला घेऊन भूजल व्यवस्थापनातून वसुंधरेला सुजलाम् सुफलाम् बनवण्याचा प्रयत्न करावा. परंतु आत्महत्यांकडे शेतकऱ्यांनी वळू नये.

डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी भूगर्भातील व वातावरणातील बदलाला सामोरे जात असताना पारंपरिक ज्ञान कसे जोपासावे, याअनुषंगाने शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले. शिबिरासाठी डॉ. कैलास पाथ्रीकर, डॉ. प्रसन्न पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप देवजीभाई पटेल यांनी केला.

डॉ. शरद गायकवाड, डॉ. इरफान शहा, डॉ. पी. एल. साळवे, जी. डी. महाजन, डॉ. पी. एस. कुलकर्णी, व्ही. आर. गोराडे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, नरहरी शिवपुरे यांनी मार्गदर्शन केले.

कृषिकन्या सायली देशमुख आणि इतर कृषिकन्या, जलमित्र यांचा अनुभव कथनांचा कार्यक्रम पार पडला. समारोप सत्रात डॉ. सुहास आजगावकर, रतन अंभोरे, श्यामसुंदर नाईक यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. मंजूषा नळगीरकर यांनी केले. प्रा. विजय पांडे यांनी आभार मानले..

CS Scanned with

दै. पुढारी - 18.12.2019 (15)

# फुलंब्रीत भूजल प्रशिक्षण शिबीर

फुलंब्री, प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी दोन दिवसीय भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे महाविद्यालयात आयोजन करण्यात आले.

शिबिरात सहा सत्रांतर्गत विविध विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व कार्यक्रम आयोजनामागची भूमिका प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी मांडली. डॉ. वक्ते म्हणाले की, भूजल व्यवस्थापन कसे करावे, हे सांगण्याची वेळ आज आली आहे. याचे कारण म्हणजे औद्योगिक प्रदूषणामुळे वातावरणात झालेला बदल आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती करण्यावर भर द्यावा आणि आध्यात्मिक ज्ञानाकडे डोळसपणे पाहण्याची गरज वाटते जेणेकरून शेतकऱ्यांनी विचार शांती मिळण्यास मदत होईल. याप्रसंगी सहा सत्रांत डॉ. सर्जेराव ठोंबरे, डॉ. कैलास

Scanned with



फुलंब्री : सावता महाविद्यालयात भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

पाथ्रीकर, डॉ. प्रसन्न पाटील, संजय शिंदे, देवजीभाई पटेल, डॉ. शरद गायकवाड, डॉ. इरफान शहा, जी.डी. महाजन, डॉ. पी.एस. कुलकर्णी, प्रल्हाद आरसूल, प्रा. बाबासाहेब लहाने, व्ही.आर.गोराडे, नरहरी शिवपुरे, सायली देशमुख, रतन अंभोरे, संस्थेचे सचिव शामसुंदर नाईक, यांची भाषणे झाली. शिबिरासाठी प्रा.डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. विजय पांडे, प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. महेश थोरात, डॉ.मंजूषा नळगीरकर, डॉ. राजश्री पवार, डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. दत्तात्रय येडले, डॉ. सुरेश मुंढे, डॉ. संदीप जगताप, दयानंद कांबळे, प्रेम चव्हाण, बाबासाहेब दाभाडे, रत्नाकर जाधव यांनी परिश्रम घेतले.

mtaurangabad@timesgroup.com

24/12/19 मटा

# जलव्यवस्थापन तंत्र शेतकऱ्यांनी शिकावे

औरंगाबाद : आधुनिक शेतीसाठी शेतकऱ्यांनी गांभीर्याने विचार करावा. जलव्यवस्थापनावर भर द्यावा आणि आध्यात्मिक ज्ञानाकडे डोळसपणे पहावे. त्यातून शेतकऱ्यांना स्थैर्य प्राप्त होईल, असे प्रतिपादन प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालया यांच्यातर्फे दोन दिवसांचे भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. फुलंब्री येथील सावता माळी महाविद्यालयात शिबिर पार पडले. प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांनी शिबिराचे उद्घाटन केले. भूजल व्यवस्थापन सांगण्याची वेळ आली आहे. औद्योगिक प्रदूषणामुळे वातावरणात बदल झाला आहे. या समस्येतून शेतकऱ्यांनी मार्ग काढावा आणि शेतीबाबत व जलव्यवस्थापनाबद्दल गांभीर्याने विचार करावा. पारंपरिक शेती करण्यावर भर द्यावा आणि आध्यात्मिक ज्ञानाकडे डोळसपणे पाहण्याची गरज वाटते. त्यातून स्थैर्य मिळालेले शेतकरी आत्महत्येसारखा विचार करणार नाहीत, असे डॉ. वक्ते म्हणाले.

बीजभाषक डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी भूगर्भातील व वातावरणातील बदलाला सामोरे जातना पारंपरिक ज्ञानाला सामोरे जाण्याबाबत मार्गदर्शन केले. या शिबिराला बहिःशाल शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. कैलास पाथ्रीकर, डॉ. प्रसन्न पाटील व देवजीभाई पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. शरद गायकवाड, डॉ. इरफान शहा, डॉ. पी. एल. साळवे, जी. डी. महाजन, डॉ. पी. एस. कुलकर्णी, व्ही. आर. गोराडे, डॉ. एस. आर. टकले व डॉ. सुहास आजगावकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी सूत्रसंचालन केले आणि प्रा. विजय पांडे यांनी आभार मानले.